Annex - B

11

# उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग पुणे, यांचे कार्यालय सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४.

विषय :- मौजे भांबुर्डा येथील फॉ.स.नं. ८१ व ९४ मध्ये सिंम्बॉयसिस सोसायटी पुणे यांनी वाहनतळ व तारेचे कंपाऊंड करून अतिक्रमण केले बाबत.

जा. क्र. कक्ष ३/जमीन/ १२६९ /२००६-२००७.
पुणे - ४११ ००४, दिनांक ३ जुलै २००६.

ज्ञापन

संदर्भ - मुख्य वनसंरक्षक वं केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे कडील गोपनीय पत्र क्र. कक्ष-१७/नोसेल/२/आ.डी.११३४६/३९५ ए, दिनांक १३/६/२००६.

वनक्षेत्रपाल, भांबुर्डा यांना विषयांकित प्रकरणाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मौजे भांबुर्डा येथील फॉ.स.नं. ८१ व ९४ मध्ये सिंम्बॉयसिस सोसायटी पुणे यांनी केलेल्या अतिक्रमणाबाबत आपले अधिनिस्त वनपाल, भांबुर्डा यांनी प्रथम गुन्हा रिपोर्ट क्रमांक ओ-१/ २००३-०४ दिनांक २७/६/२००३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. तद्‌अनुषंगाने आपले मार्फत चौकशी करून संबंधीत संस्थेचे संचालक यांचेकडून अतिक्रमण केले बाबतचा जबाब घेण्यात येऊन चौकशी पुर्ण करण्यात आलेली आहे. तसेच चौकशी अहवाल तपासणीसह गुन्हे काम सादर केला आहे. सदर चौकशी अंतर्गत आपण वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कायद्यानुसार संबंधीतांवर कारवाई करण्यास कळविले आहे.

मा. मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडील गोपनीय पत्र क्र. कक्ष-१७/नोसेल/२/आ.डी.११३४६/३९५ ए, दिनांक १३/६/२००६ अन्वये निर्देशीत केल्याप्रमाणे तसेच आपण सादर केलेल्या अहवालानुसार सिंम्बॉयसिस सोसायटी पुणे यांचे विरूध्द मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, शिवाजीनगर पुणे यांचे न्यायालयात भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६(फ), (ह) व ६३(क) तसेच वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत कार्यवाही करण्यास अनुमती देण्यात येत आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करून अनुपालन अहवाल इकडे सादर करावा. तदनंतर मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य नागपूर यांना प्रकरणाचे अनुषंगाने विस्तृत कृती अहवाल सादर करण्यात येईल.

उपवनसंरक्षक
पुणे वनविभाग पुणे

प्रति,

वनक्षेत्रपाल, भांबुर्डा.

प्रतिलिपी

१. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांना त्यांचेकडील ज्ञापन क्रमांक कक्ष-१/जमीन/ प्रस्ताव-३४/१२०२, दिनांक २८/६/२००६ अन्वये माहितीसाठी सविनय सादर.
२. सहाय्यक वनसंरक्षक (भवका), पुणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.
३. अध्यक्ष संस्थापक व संचालक, सिम्बॉयसिस सोसायटी, सेनापती बापट मार्ग, पुणे ४ यांना माहितीसाठी.

उपवनसंरक्षक
पुणे वनविभाग पुणे

E:\Land Sec\Vikas\Letter to CCF reg Symbiosis society pune.doc